# वाईट सवयी सोडा:

## येशू दारू, अंमली पदार्थ आणि दुराचरण यावर विजय मिळवून देतो

मुलांना शिकविणाऱ्यांनी C9b हा अभ्यासक्रम वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय देवा, ख्रिस्तामध्ये आम्हांला मिळालेले महान स्वातंत्र्य समजून घेण्यास व अनुभवण्यासाठी आमचे साहाय्य कर''.

1. **देवाच्या वचनाच्या साहाय्याने तुमच्या अंत:करणाची व मनाची तयारा करा**

**पाहा मार्क 5:1-20** मध्ये देवाचे सामर्थ्य आम्हांला सैतानाच्या सामर्थ्यापासून मुक्त करते.

- येशूने भुतांनी पछाडलेल्या माणसाला काय केले?
- त्या माणसाची सैतानापासून सुटका केल्यावर येशूने त्याला कोठे पाठविले?

देव लोकांना त्यांच्या जीवनात केलेल्या पातकांचा कसा निकाल करतो हे इफिसकरांना पौलाने शिकविले.

- कृपा करून प्रैलाने इफिसकरांना लिहिलेले पत्र वाचा.
- इफिसकरांकडून पुढील सात पायऱ्या शिका. यातून त्यांनी त्यांच्या जीवनात केलेल्या पातकांपासून येशूच्या सामर्थ्याच्याद्वारे भक्ती मिळण्यास साहाय्य होईल.

**पायरी क्र.1. *आपल्या पवित्र देवाने आपल्याला आशीर्वाद देण्याचे अभिवचन दिले त्यावर भरवंसा ठेवा.***

पाहा **इफिस 1:3-14** मध्ये देवाने आपल्याला अगोदरच ख्रिस्तामध्ये देऊन ठेवलेले आशीर्वाद, जसे:

- त्याने आपल्याला जगाच्या स्थापनेपूर्वीच निवडून घेतले आणि सर्व आध्यात्मिक आशीर्वादांनी समृध्द केले.
- त्याने आम्हांला निर्दोष, पवित्र होण्यासाठी निवडले आणि आमच्या सर्व अपराधांची क्षमा केली.
- तो आम्हांला ज्ञान व बुध्दी देतो.
- स्वर्गात सदासर्वकाळ त्याच्या बरोबर राहण्यास जाईपर्यंत येथे त्याच्या हातात सुरक्षित राहावे म्हणून तो आपल्यावर त्याच्या पवित्र आत्म्याचा शिक्का मारतो.

तुमच्या मंडळीने देवाला स्वीकारावे आणि ह्या अभिवचनांसाठी त्याला धन्यवाद द्यावेत याकरिता त्यांना मदत करा.

**पायरी क्र.2. *येशूवरील विश्वासाच्याद्वारे आपल्याला देवाची अपार कृपा मिळते, ती देण्याची विनंती करा.***

पाहा **इफिस 2:1-10** मध्ये देवाची कृपा मिळविण्याचा आणि लोकांची त्यांचे पाप व त्याचा दंड यापासून सुटका होण्याचा एकमेव मार्ग.

- तारण व्हावे यासाठी आपण काय केले पाहिजे? (पाहा वचन ८)
- देवाची कृपा व दया आपल्याला कोणाच्याद्वारे मिळते?

**पायरी क्र.3. *एकमेकांना आपआपली चुका कबूल करून सुधारण्यास साहाय्य करा.***

पाहा **इफिस 3:10** व इफिस **5:21** मध्ये विश्वासणाऱ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळावे यासाठी या जगात देव कोणाच्या द्वारे कार्य करतो.

- पाहा इफिस 4:11-16 मध्ये एकमेकांची वाढ होण्यास मदत व्हावी याकरिता देव तुमच्या संपूर्ण मंडळीला कशाप्रकारे सुसज्ज करतो.

- दारू, अंमली पदार्थ किंवा लैंगिक पापाच्या आहारी गेलेल्याला प्रोत्साहन देण्यासाठी ठाम समाजाची गरज आहे.
- एखादी व्यक्ती तिच्या वाईट सवयी सोडून देते तेव्हा त्याने केलेली पापे येशूकडे कबूल करण्यासाठी त्याला एखाद्या आपुलकी दाखवणाऱ्याची आवश्यकता असते.
- ह्या 'आपुलकी दाखवणाऱ्या' मुळे व्यसनाधीन व्यक्तीला त्याच्या जीवनात बदल करण्यासाठी मदत होते.
- व्यसनाधीन व्यक्तीच्या कुटुंबियांनी कोणतीही सबब न सांगता त्याचे पाप त्याला प्रेमाने पण ठामपणे दाखवून दिले पाहिजे,
- व्यसनी व्यक्तीचे व्यसन सुटावे यासाठी देव मित्रांच्या मदतीचा उपयोग करून घेतो. ते त्याला त्याच्या जीवनात आवश्यक ते बदल करण्यास प्रोत्साहन देतात आणि सैतानाच्या मोहपरीक्षेत देवाच्या सामर्थ्याची आठवण करण्यास साहाय्य करतात. हे मित्र 2 राजे 12:2 मधील तरुण यहोआश राजाला मार्गदर्शन करून सल्लामसलत देणाऱ्या यहोयादा याजकासारखे सुज्ञ असतात.
- व्यसनाधीन व्यक्तीला पाच प्रकारे मदतीची गरज असते: 1) त्याला विश्वासाने प्रार्थना करण्याची विनंती करता येईल असा गट, 2) प्रेमळ मार्गदर्शक, 3) पवित्र आत्म्याचे सामर्थ्य देव त्याचा धावा करणाऱ्यांना देतो, 4) आपला पापी स्वभाव व कृत्ये वधस्तंभावर खिळण्याचा त्याचा स्वत:चा ठाम निश्चय आणि 5) त्याच्या पापाविषयी त्याच्या कुटुंबियांनी केलेली प्रमाणिक चर्चा व प्रोत्साहन, दावीदाच्या लोकांनीही 1 राजे 1 मध्ये त्याला प्रोत्साहन देऊन त्याचे पाप त्याला दाखवून दिले.

**पायरी क्र.4.** ***वाईट सवयीचे मूळ कारण शोधा आणि ती सुटेपर्यंत त्यावर लक्ष केंद्रित करा.***

पाहा इफिस 4:22-32 मध्ये पाप करण्यास प्रवृत्त करणारे दृष्टीकोन आणि पाप दूर करणारे दृष्टीकोन पाहा याकोब 3:13-4:3 मध्ये लोकांच्या जीवनातील अधिक त्रासाचे कारण.

लोकांना दुर्बल करणाऱ्या वृत्तीचे मूळ कारण पाहा, केवळ त्यांच्या वृत्तीची लक्षणे (वाईट परिणाम)पाहू नका.

देव आमची सैतानापासून सुटका करतो आणि योग्य त्या गोष्टीची निवड करण्याचे आम्हांला सामर्थ्य देतो.

**पायरी क्र.5.** ***आपल्या स्वत:च्या वाईट सवयींवर निर्भयपणे व निश्चयाने हल्ला चढवा.***

पाहा इफिस 5:3-14 मध्ये आपल्या जीवनातील पापाकडे पाहण्याचा दृष्टीकोन.

- आमच्या वृत्ती-प्रवृत्ती आणि पातके आम्ही कबूल करतो तेव्हा तो ख्रिस्ताच्या प्रकाशात पाहा.
- पाहा याकोब 5:13-16 मध्ये आजारपण किंवा पापामुळे त्रास सहन करणाऱ्यांशी वडीलजन कसे वागतात.

**पायरी क्र.6.** ***सैतान, त्याचे भुतावळीचे सैन्य आणि त्यांची फसवणूक यांच्या विरुद्ध आक्रमक युद्ध पुकारा***

पाहा इफिस 6:10-18 मध्ये सैतानाच्या मोह परीक्षांपासून आपल्याला कसे संरक्षण मिळविता येते.

- देवाच्या शस्त्रसामग्रीतील प्रत्येक शस्त्र धारण करण्याचा अर्थ पाहा.
- वचन 18 मध्ये पाहा दुष्टाचे हल्ले परतवून लावण्यासाठी आपण किती प्रार्थना केली पाहिजे.
- पाहा मार्क 9:14-29 मध्ये आरोग्य देण्यासाठी प्रार्थनेचे सामर्थ्य.

**2. आठवड्यामध्ये करावयाच्या कार्यक्रमांची सहकाऱ्याबरोबर चर्चा करा.**

- सहा पायऱ्यांचा उपयोग करून परिपक्व विश्वासणाऱ्यांना व्यसनाच्या आहारी गेलेल्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण दया.

- लहान गट करून व्यसनाधीन लोकांना मार्गदर्शन करा व त्यांच्या बरोबर प्रार्थना करा. यासाठी तुम्हांला नवा गट तयार करावा लागेल.

**3. येणाऱ्या उपासना सभेविषयी सहकाऱ्यांशी चर्चा करा**

स्थानिक रूढी परंपरा व सध्याच्या गरजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

पौलाने इफिस 3:14-21 मध्ये इफिसकरांसाठी केलेली प्रार्थना करा.

भाग 1 मध्ये व्यसनांपासून सुटका मिळविण्याच्या सहा पायऱ्यांचे स्पष्टीकरण करा.

देवाची स्तुती करा कारण त्याचा आत्मा आम्हांला बदलून टाकतो. व्यसनावर मिळविलेल्या विजयाविषयी विश्वासणाऱ्यांना साक्ष देण्यास सांगा.

भुतांपासून सुटका झालेल्या मनुष्याचा कथावृत्तांत सांगा किंवा नाट्यीकरण करा. हे सांगण्यासाठी मदतनीसांना तयार करा. प्रथम येशूने त्या मनुष्यासाठी काय केले ते ऐकण्यास सांगा. मग त्यांना काय समजले ते विचारा.

व्यसनावर विजय हे प्रात्यक्षिकातून दाखवा.

**श्रीयुत फसवणूक** मद्यपानाने धुंद झाल्याचा अभिनय करतो : तो आपल्या हाताला लागलेली घाण स्वच्छ करण्याचा प्रयत्न करतो. तो सांगतो की काल रात्रीच्या त्याच्या दुर्बलतेबद्दल त्याला वाईट वाटते.

**श्रीयुत सर्प** त्याच्यावर जोराने ओरडतो, ''तू निरूपयोगी आहेस आता देव तुला वाचवू शकणार नाही. ह्या मोह परीक्षेवर तुला कधीच विजय मिळविता येणार नाही.'' आणि विकट हास्य करतो.

**श्रीयुत फसवणूक** येशूला त्याची पातके व मद्यपानाचे व्यसन दूर करण्याची विनंती करतो. तो पाण्याच्या भांड्यात हात धुऊन म्हणतो, "मी स्वच्छ झालो, आई!''



मुलांनी तयारी केलेली कविता, नाटिका व प्रश्न त्यांना प्रौढांसमोर सादर करण्याची संधी द्या.

व्यसनाधीन लोकांना मदत करण्यासाठी तुम्ही आठवड्यामध्ये आयोजित करणार असलेल्या कार्यक्रमांकविषयी सविस्तरपणे सांगा.

विश्वासणाऱ्यांनी दोन वा तीन जणांचे गट करून एकमेकांसाठी प्रार्थना करावी व प्रोत्साहन द्यावे तसेच त्यांच्या योजनांना अंतिम स्वरूप द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी योहान 6:25-35 वाचा. येशूने 5000 लोकांना भोजन दिल्यावर काही लोकांनी आणखी जेवण त्याच्याकडे मागितले, परंतु त्यांना भाकरी देण्याऐवजी सार्वकालिक जीवन देऊ केले. प्रभुभोजनामध्ये आपण ह्याच भाकरीतून सेवन करतो. याचे स्पष्टीकरण 1 करिंथ 10:16-17 मध्ये दिलेले आहे.

पाठ करा गलती 5:24.

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net